20-02-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 02/19/2025 10:57 PM Page 1



## निवडक

### रवळनाथ देवस्थान पदाधिकाऱ्यांचा शपथ सोहळा

■ टीम दैनिक हेराल्ड



**हरमल, दि. १९ :** येथील ग्रामदैवत श्री देव रवळनाथ पंचायतन देवस्थानच्या नूतन कार्यकारी उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी नुकतीच मामलेदार कार्यालयात शपथ समारंभ झाला. पेडणे तालुक्याचे मामलेदार रणजित सातार्डेकर यांनी देवस्थानच्या पदाधिकाऱ्यांना शपथ दिली.यावेळी देवस्थानचे अध्यक्ष नारायण शेणवी केरकर, उपाध्यक्ष मनोज शेणवी केरकर, सचिव रोहन शेणवी केरकर, उपसचिव नंदन शेणवी केरकर, खजिनदार देवेंद्र शेणवी केरकर, उप खजिनदार सोहन शेणवी केरकर, मुखत्यार ब्रजेश शेणवी केरकर व उपमुखत्यार राजेंद्र शेणवी केरकर यांनी शपथ घेतली.
दरम्यान, श्री देव रवळनाथ पंचायतन देवस्थानचा २६ वा वर्धापनदिन उत्सव मोठ्या उत्साहात व ग्रामस्थांनी योग्य सहकार्याने यशस्वी झाल्याबद्दल ग्रामस्थ व भाविकांचे आभारी आहे. महाजन व मानकरी तसेच ग्रामस्थांच्या सहकार्याने, देवस्थानचा विकास करण्याची ग्वाही मुख्यत्यार ब्रजेश केरकर यांनी दिली.

---



### शांता विद्यालयाचा भव्य शिवजयंती सोहळा

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. १९ :** निश्चयाचा महामेरू, अखंड स्थितीचा निर्धारू, पुण्यवंत, यशवंत, दानशील, धर्मशील, अशा गुणांनी समृद्ध, असे आपले श्री छत्रपती शिवाजी महाराज एक आदर्श योद्धा, उत्कृष्ट शासनकर्ता, प्रजाहितदक्ष कल्याणकारी राजा म्हणून जगामध्ये आणि विशेष करून मराठी इतिहासामध्ये एक उच्च स्थान त्यांना मिळालेला आहे, त्यांच्या अंगी असलेले राष्ट्रभक्ती दृढनिश्चयी एकात्मता, असे असंख्य गुण आमच्यामध्ये आत्मसात करण्याचा निश्चय करण्याचा आजचा हा दिवस आहे, असे प्रतिपादन शिक्षक उमेश महालकर यांनी केले. विद्याभारती संचालित सडये शिवोली येथील श्री. शांता विद्यालयाचे शिवजयंती मोठ्या जल्लोषात व उत्साहात साजरी केली यावेळी ते प्रमुख वक्ते या नात्याने ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात शिव पूजनाने करण्यात आली. या कार्यक्रमाला मुख्याध्यापिका सौ.प्रजिता सांगाळे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थीगण उपस्थित होते. यावेळी ऊर्जात्मक असे सुरेल शौर्य गीत बी.एड प्रशिक्षणार्थी शिक्षक तेजस वेर्णेकर यांनी सादर केले तसेच शिक्षक नवनाथ सावंत यांनी शिवरायांची यशोगाथा सांगणारा पोवाडा सादर केला. या कार्यक्रमाचे नियोजन व सूत्रसंचालन शिक्षक विश्वास सांगळे यांनी केले व आभार प्रकटन शिक्षक श्री संगम चोडणकर यांनी केले. कार्यक्रमाची सांगता शिवगर्जनेने करण्यात आली.

---



हरमल : रवळनाथ देवाचा वर्धापनदिन सोहळ्यात पालखी मिरवणूक व सहभागी सुहासिनी दिवजासहित.

### रवळनाथ देवस्थानचा वर्धापनदिन उत्साहात साजरा

■ टीम दैनिक हेराल्ड

हरमल, दि. १९ : येथील ग्रामदैवत श्री देव रवळनाथ पंचायतन देवस्थानचा २६ वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.
या उत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. दुपारी महाप्रसाद घेण्यास हजार पेक्षा जास्त भाविकांनी आशीर्वाद घेतला. मांद्रे मतदरसंघाचे आमदार तथा गोवा हाउसिंग बोर्डाचे चेअरमन जीत आरोलकर यांनी श्री देवाचा आशीर्वाद घेतला व भाविक कार्यकर्त्यांशी संवाद साधला. सुहासिनीच्या दिवजोत्सवत हजार पेक्षा जास्त सुहासिनीनी भाग घेतला. त्यानंतर 'स्त्री चरित्रच महान' हे दशावतारी नाटक हरमल श्री रवळनाथ दशावतारी नाट्य मंडळ, देऊळवाडा यांनी सादर केले. सदर नाटक आमदार जीत आरोलकर यांनी पुरस्कृत केले होते. यावेळी उत्सव समितीचे अध्यक्ष नारायण केरकर व मुखत्यार ब्रजेश शेणवी केरकर व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

---



मोरजी : शिवजयंती कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी व शिक्षक.

### विद्याप्रसारक विद्यालयात शिवजयंती सोहळा उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १९ :** विद्याप्रसारक विद्यालय मोरजी येथे शिवजयंती निमित्त खास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सर्वप्रथम सकाळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा जयघोष करत शाळेपासून मोरजाई मंदिरापर्यंत मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत माध्यमिक विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता. मिरवणुकीनंतर शाळेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून विद्याप्रसारक विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक तसेच प्रसिद्ध कीर्तनकार श्रीविष्णु बुवा शेटगावकर हे उपस्थित होते. त्याचबरोबर एस.एम.सी चे अध्यक्ष राजेंद्र शेटगावकर व मुख्याध्यापक दिलीप मेथर व कार्यक्रम प्रमुख शिक्षक पद्माकर नाईक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून करण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यावर आधारित अनेक गोष्टी सांगून शिवाजी महाराजांची चरित्र सर्वांसमोर साकार केले. शाळेतील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची थोरवी गाणारे अनेक नृत्य सादर करून कार्यक्रमाला शोभा आणली. प्रमुख वक्ता शिक्षक दयानंद राणे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल माहिती देत क्षत्रिय असण्याचा खरा अर्थ काय आहे हे विद्यार्थ्यांना सांगितले. शिवाजी महाराजांचे खरे भक्त म्हणणाऱ्या प्रत्येकाने शिवाजी महाराजांचे विचार आणि संस्कार आत्मसात करून त्याप्रमाणे वागले पाहिजे, असे ते यावेळी म्हणाल. विष्णू शेटगावकर यांनी शिवाजी महाराजांच्या चरित्राबद्दल आपले विचार व्यक्त करत शिवाजी महाराजांना मानवंदना दिली. मुख्याध्यापकदिलीप मेथर यांनी या दिनाच्या शुभेच्छा देत इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती पुरस्कृत केल्याबद्दल त्यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी कुमारी वैदेही जनार्दन शेटगावकर हिने केले. तर वेदिका संजय सावंत हिने आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# टीम इंडिया विजयी शुभारंभासाठी सज्ज

## चॅम्पियन्स ट्रॉफीत आज बांगलादेशशी भिडणार : लोकेश राहुलला संधी मिळणार

**दुबई, दि. १९ :**

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या आधी, भारतीय क्रिकेट संघाने तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेत इंग्लंडचा ३-० असा क्लीन स्वीप केला होता आणि रोहितच्या नेतृत्वाखाली टीम इंडिया या आयसीसी स्पर्धेत बांगलादेशविरुद्धच्या या स्पर्धेत आत्मविश्वासाने सुरुवात करेल. भारताला दुबईत चॅम्पियन्स ट्रॉफीचा पहिला सामना बांगलादेशविरुद्ध खेळायचा आहे आणि साहजिकच टीम इंडियाला विजयाने सुरुवात करायची आहे.

बांगलादेशसोबतच पाकिस्तान आणि न्यूझीलंड हे संघ भारताच्या गटात आहेत आणि टीम इंडियाला उपांत्य फेरी गाठण्यासाठी प्रत्येक सामना गांभीर्याने घ्यावा लागेल. भारताला तीन साखळी सामने खेळायचे आहेत आणि एकही सामना गमावल्यास प्रकरण अडकू शकते, अशा परिस्थितीत टीम इंडियाला विजयापेक्षा कमी काहीही नको आहे. बांगलादेश संघाला कोणत्याही




परिस्थितीत कमी लेखणे भारतासाठी चुकीचे ठरेल आणि टीम इंडियाला पूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरावे लागेल.

भारतीय संघात जसप्रीत बुमराह नाही ज्यामुळे टीम इंडियाचा वेगवान आक्रमण निश्चितच कमकुवत झाले आहे, परंतु संघात वरिष्ठ वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी आहे जो त्याची कमतरता भरून काढताना दिसतो. शमीचा अनुभव लक्षात घेता त्याला प्लेइंग इलेव्हनमध्ये नक्कीच संधी दिली जाईल, तर त्याला साथ देण्यासाठी डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शदीप सिंग प्लेइंग इलेव्हनचा भाग असू शकतो. तर हार्दिक पांड्या संघासाठी तिसऱ्या वेगवान गोलंदाजाची भूमिका साकारणार आहे.

भारतीय संघात सध्या ५ फिरकीपटू आहेत, त्यापैकी टीम इंडिया प्लेइंग इलेव्हनमध्ये तीन फिरकीपटूंचा समावेश करू शकते. फिरकीपटू अक्षर पटेल आणि रवींद्र जडेजा हे बांगलादेशविरुद्धच्या संघाचा भाग असण्याची शक्यता आहे आणि या दोघांमध्येही फलंदाजीत हात दाखवण्याची ताकद आहे. आणि या दोघांमध्ये फलंदाजीतही हात दाखवण्याची ताकद आहे, तर कुलदीप यादव त्यांना साथ देताना दिसतो.

संघात यष्टीरक्षक म्हणून केएल राहुल असेल, जो सध्या एकदिवसीय सामन्यात पहिल्या क्रमांकाचा यष्टीरक्षक आहे आणि संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनीच हे सांगितले आहे. केएलच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये असल्यामुळे ऋषभ पंतला बेंचवर बसावे लागणार आहे. यशस्वीच्या जागी वरुण चक्रवर्तीचा संघात समावेश करण्यात आला होता, मात्र त्याच्या कमी अनुभवामुळे त्याला प्लेइंग इलेव्हनमधून बाहेर ठेवले जाऊ शकते.

गौतम गंभीर जेव्हापासून टीम इंडियाचा मुख्य प्रशिक्षक झाला आहे, तेव्हापासून संघात किमान ८ फलंदाजांचा समावेश करण्यावर त्याचा भर आहे आणि तो या रणनीतीसह पुढे जाईल. अशा स्थितीत रोहित आणि शुभमन गिलने सलामी दिली तर विराट कोहली तिसऱ्या क्रमांकावर तर श्रेयस अय्यर चौथ्या क्रमांकावर दिसेल. आता अक्षर पटेल पाचव्या क्रमांकावर राहणार की खालच्या क्रमांकावर खेळणार हे पाहणे बाकी आहे. यानंतर केएल राहुल, हार्दिक पांड्या आणि रवींद्र जडेजा फलंदाजीत दिसू शकतात.

### भारताचे पारडे जड

**भारतीय संघाने चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी ३ सामन्यांच्या मालिकेत इंग्लंडचा ३-० ने पराभव केला होता, तर बांगलादेशला चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या अपात्र ठरलेल्या वेस्ट इंडिजकडून ३-० ने पराभूत केले होते.चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या दुसऱ्या सामन्यात, जिथे भारतीय संघ विजयाने सुरुवात करण्याच्या इराद्याने मैदानात उतरेल, तिथे बांगलादेशला आपली कामगिरी सुधारायची आहे.**

### भारतच वरचढ

**टीम इंडियाने बांगलादेशकडून गेल्या ५ पैकी ३ सामन्यात पराभव पत्करला आहे, ज्यामुळे टीम इंडियाचा विक्रम बिघडला आहे. तथापि, मागील मालिकेत बांगलादेशची कामगिरी खराब झाली होती, जिथे त्यांना वेस्ट इंडिजकडून ३-० ने पराभव पत्करावा लागला आणि चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी पात्रताही मिळवता आली नाही.**

### संभाव्य प्रतिस्पर्धी संघ

**भारत** : रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल (उपकर्णधार), विराट कोहली, श्रेयस अय्यर, अक्षर पटेल, केएल राहुल (यष्टीरक्षक), हार्दिक पंड्या, रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, अर्शदीप सिंग, मोहम्मद शमी.
**बांगलादेश** : नजमुल हुसेन शांतो (कर्णधार), सौम्या सरकार, तनजीद हसन, तौहीद हृदय, मुशफिकूर रहीम, महमुदुल्ला, झाकीर अली, मेहदी हसन मिराज, रिशाद हुसेन, तस्किन अहमद, मुस्तफिजुर रहमान, परवेझ हुसैन इमोन, नसुम अहमद, तन्जीद हसन, तनजीद हसन, नजमुद हसन, नजमुद हसन.

# गोवा विद्यापीठात शिवजयंती महोत्सव थाटात



दोनापावला : शिवजयंती महोत्सव सहभागी गोवा विद्यापीठातील कुलगुरू हरिलाल मेनन. बाजूला डॉ. अनिल सामंत, विद्यार्थी व मान्यवर .

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १९ :** गोवा विद्यापीठ, मराठी अध्ययनशाखा आणि गोवा विद्यापीठ विद्यार्थी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठात शिवजयंती महोत्सव थाटात झाला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे कुलगुरू आदरणीय प्रोफेसर हरिलाल मेनन उपस्थित होते. गोवा मराठी अकादमीचे अध्यक्ष प्रा. अनिल सामंत हे कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात भव्य मिरवणुकीतून झाली. गोवा विद्यापीठाच्या विद्यार्थी मंडळाने या मिरवणुकीचे नेतृत्व केले. मंचीय समारंभात वक्तव्य करत असताना श्री शिवछत्रपतींचा आदर्श आजच्या युवकांनी घ्यावा स्वतःचे आणि राष्ट्राचे उज्वल भविष्य घडवण्यासाठी कार्य करावे, असे आवाहन कुलगुरूंनी केले.

श्री शिवछत्रपती महाराजांचे 'जीवन आणि विचाराची समकालीनता' या विषयावर प्राचार्य अनिल सामंतांचे वक्तव्य झाले. शिवराय हे जेवढे महाराष्ट्राचे, मराठीचे आणि भारताचे आहेत तेवढेच ते गोव्याचेही आहेत, असे उद्गार याप्रसंगी वक्त्यांनी व्यक्त करत विद्यापीठात असे कार्यक्रम करण्याबाबत आयोजकांचे कौतुक केले.

मराठी अध्ययनशाखेचे संचालक डॉ. विनायक बापट यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कार्यक्रमात विनय राऊत, प्रा. अनुराधा वागळे यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे संयोजक डॉ. हेमंत अय्या यांनी आभार मानले. प्राप्ती गावकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.




डिचोली : शांतादुर्गा विद्यालयात शिजयंती उत्सवात मुलांनी विविध पेहराव करून शिवकालीन आठवणी ताज्या केल्या. सोबत कुंदन फोगेरी, विजय सरदेसाई, अभिजित तेली, अरुण साळकर व इतर.

### शांतादुर्गा विद्यालयात शिवजयंती साजरी

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १९ :** डिचोली येथील श्री शांतादुर्गा विद्यालयात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त विद्यार्थ्यांनी विविध कार्यक्रम वेशभूषा सादर करून शिवरायांच्या राजवटीतील प्रसंग उभे केले.

युवा उद्योजक व समाज कार्यकर्ते कुंदन फोगेरी प्रमुख पाहुणे या नात्याने उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष विजय सरदेसाई अभिजीत तेली, अरुण साळकर, राजेश धोंड, दिनेश मयेकर, कौस्तुभ पाटणेकर, एडना रॉड्रिगीस, हरिप्रसाद ठाकूरआदी व्यासपीठावर उपस्थित होते.

कुंदन फोगेरी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या असामान्य कर्तृत्व, युद्धनीती, प्रजे प्रति असलेला आदर व त्यांनी जीवनात अंगीकारलेले गुण याबद्दल विद्यार्थ्यांना अभ्यासपूर्ण मार्गदर्शन करताना त्यांचे गुण आत्मसात करण्याचे आवाहन केले. विजय सर देसाई यांनी विचार व्यक्त केले. यावेळी विद्यार्थ्यांनी शिवाजी शिवकालीन इतिहासाची साक्ष देणाऱ्या विविध पेहराव करून वाहवा मिळली.



कवळे : छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करते वेळी सरपंच वसुंधरा सावंत. बाजूला उदय कवळेकर, सुदेश पारोडकर व संदेश कपिलेश्वरकर.

### सरस्वती हायस्कूलमध्ये शिवजयंती साजरी

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. १९ :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श व त्यांचे गुण मुलांनी आत्मसात करावे या हेतूने दरवर्षीप्रमाणे यंदाही कवळे येथील श्री सरस्वती हायस्कूलमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. तळावली येथील श्री महालक्ष्मी देवस्थान ते हायस्कूलपर्यंत काढलेल्या पायी मिरवणुकीत श्री सरस्वती हायस्कूल, पूर्व प्राथमिक व प्राथमिक विद्यालयाचे मिळून सुमारे २५० विद्यार्थी तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सहभागी झाले होते. 'जय शिवाजी जय भवानी', 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' अशा जयघोषात व ढोल ताशांच्या निनादात अवघा परिसर शिवमय झाला होता.

सर्वप्रथम वाडी - तळावली ग्रामपंचायतीच्या सरपंचा वसुंधरा सावंत यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी श्री सरस्वती ज्ञान प्रसारक संस्थेचे उपाध्यक्ष उदय कवळेकर, हायस्कूलचे मुख्याध्यापक सुदेश पारोडकर व संदेश कपिलेश्वरकर उपस्थित होते. त्यानंतर पायी मिरवणुकीस प्रारंभ झाला.विद्यार्थ्यांनी सुरेख लेझीम नृत्यही सादर केले. काही विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराज, तानाजी मालुसरे, जिजाबाई, मावळे आदींचा वेश परिधान केला होता.या परिसरात भगवेमय वातावरण निर्माण झाले होते.

# शिवरायांचे प्रशासन अंमलात यावे

## मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत : साखळीत शिवजयंती साजरी

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १९ :** शिवाजी महाराज यांचे कार्य सदोदित युवकांना, राज्य कर्त्यांना प्रेरणा देणारे आहे. शिवाजी महाराजांचे प्रशासन अंमलात आणण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न सुरू आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी साखळी शिवचौकात आयोजित शिजयंती कार्यक्रमात बोलताना केले.

यावेळी साखळी पालिका नगरसेवक, भाजप कार्यकर्ते शिवप्रेमी नागरिक उपस्थित होते.



साखळी : शिवाजी महाराज पुतळ्यास पुष्पहार अर्पण करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. सहभागी शिवप्रेमी.

मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी शिवपुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. शिवरायांचे गुण आत्मसात करीत युवा पिढीने चांगले आचार विचार संस्कार अंगीकरून आदर्श समाज व आदर्श नागरिक व्हावे, असेही मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी दुपारी साखळी मतदार संघा तून भव्य शोभा यात्रा काढण्यात आली त्यात मोठ्या सखेने शिवप्रेमी सहभागी झाले होते.

# विकास हायस्कूलमध्ये शिवजयंती उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. १९ :** वळपे पेडणे येथील विकास हायस्कूलमध्ये शिवजयंती मोठ्या उत्साहाने विविध कार्यक्रमाने व स्पर्धानी साजरा करण्यात आली .यावेळी व्यासपीठावर हायस्कूलचे मुख्याध्यापक नागेश गोसावी ,शिक्षक प्रतिनिधी रत्नाकर राव तसेच हृदयनाथ तांबोसकर उपस्थित होते.

यावेळी सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिकृतीस पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी दीप प्रज्वलन केले. मुख्याध्यापक नागेश गोसावी म्हणाले की, हिंदवी स्वराज्य स्थापन करणारा राजा ज्याने असंख्य मावळे एकत्र करून भारतीयांचा स्वाभिमान जागा ठेवण्याचा मान आम्हास दिला त्यांच्या अलौकिक गुणांनी परक्यांच्या थरकाप उडविला असा राजा यापुढे होणे नाही आणि म्हणून त्यांचा इतिहास मुलाने वाचावा, असे उपस्थित मुलांना त्याने सुचविले. यावेळी मुलांसाठी वेशभूषा स्पर्धा, नृत्य स्पर्धा घेण्यात आल्या या शिवाजीच्या भूमिकेत कुमार वंश राव यांनी एकपात्री अभिनय सादर केला. तारिका राऊळ व पूर्वी राऊळ यांनी अनुक्रमे इंग्रजी व मराठीतून भाषणे केले .संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन व सूत्रसंचालन नंदादीप आंबेकर यांनी केले. प्रास्ताविक सोनल आरोंदेकर हिने केले. तर आभार प्रदर्शन चांदनी आरोंदेकर हिने केले.



वळपे : शिवजयंती कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थी व शिक्षक वर्ग.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १६८ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 168 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .